INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF
HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# मराठवाड्याचा सर्वांगीण विकास – एक अभ्यास
## (A Study on the overall Development of Marathwada)

**श्री. अतुल गणेश साळुंके**
संशोधक विद्यार्थी,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/12.2024-43552934/IRJHIS2412010

**१.१. प्रस्तावना :**

मराठवाडा या प्रदेशावर प्राचीन काळापासून आजतागायत अनेक प्रकारचे राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक आणि शैक्षणिक बदल झालेले आहे. अनेक परकीय तसेच स्वदेशी राज घराण्यांनी या भागावर आपली राजकीय सत्ता स्थापन केली होती.त्या त्या काळातील राजघराण्यांच्या अनेक लिखित आणि भौतिक साधने आजही मराठवाडा या विभागात सापडतात. ज्या काळात या भागावर कल्याणकारी राजे होते. त्या काळात या भागाचा झालेला विकास पहावयास मिळतो. जसे कि या भागात ज्यावेळी सातवाहन राजघराणे सत्तेवर आले. तेव्हा या भागाला राजकीय आणि सांस्कृतिक स्थैर्य प्राप्त झाले. या काळात या प्रदेशाची आर्थिक समृद्धीकडे वाटचाल झाली. (रोडे सो.२०११). तसेच ज्यावेळी दीर्घकाळ निजामांची सत्ता या भागावर होती. तेव्हा कट्टर धर्मीय आणि कल्याणकारी राजे नसल्याने या भागाच्या विकासाची मोठी हानी झाली. सदरील अभ्यासाच्या माध्यमातून मराठवाड्याचा सर्वांगीण विकासाचा अनुशेष एक समस्या या माध्यमातून महाराष्ट्रातील इतर प्रदेशाच्या तुलनेत मराठवाड्याची परिस्थिती, तसेच मराठवाड्यातील अनुशेष यावर अध्ययन करण्यात येणार आहे. यासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर केलेला आहे.

१५ ऑगस्ट १९४७ मध्ये भारत स्वातंत्र्य झाला. परंतु मराठवाडा हा प्रदेश हैद्राबाद संस्थानात असल्याने या भागाला उशिरा स्वातंत्र्य मिळाले. हैद्राबाद संस्थानच्या निजामाने भारतात विलीन होण्यास नकार दिला. त्यातून १९४८ मध्ये हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम लढला गेला आणि हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले. निजाम काळात मराठवाडा या विभागाच्या विकासाचा अनुशेष खूप मोठा होता. या भागातील सर्वच क्षेत्रातील विकासाची परिस्थिती भयावह होत चालली होती. या भागातील मराठी भाषिकांनी त्यांच्यासाठी संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली. १९५६ मध्ये मराठवाडा या प्रदेशाचा समावेश द्विभाषिक मुंबई राज्यात झाला. संयुक्त महाराष्ट्राचा लढा सुरूच होता. शेवटी १०७ लोकांच्या बलिदानानंतर १ मे १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. ज्या प्रकारे विदर्भ विकासाच्या काही अटी ठेऊन महाराष्ट्रात सामील झाला. पूर्वीपासूनच विकासाची आबाळ झालेला मराठवाडा या प्रदेशाने विकासाच्या कोणत्याही अटी न ठेवता या राज्यात सामील झाला. निजामशाही पेक्षा महाराष्ट्रात आपला जास्तीचा विचार होईल या उद्देशाने मराठवाडा संयुक्त महाराष्ट्रात

आला. याचे परिणाम आजही या भागातील जनता विकासाच्या बाबतीत सहन करतेय. मराठवाड्यासारख्या कोणत्याही मागासलेल्या प्रदेशाची विकासाची दिशा त्या परदेशाहून वरच्या पातळीवर म्हणजेच राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर अवलंबून असतो जगातील अनेक प्रदेश विकासाच्या तुलनेत कमी जास्त आहे. हे सर्व राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवरील तंत्र आणि धोरणे यावर विसंबून आहे त्यामुळे विकासाच्या बाबतीत मागे पडलेल्या भागावर गहन अभ्यास होणे अगत्याचे ठरते.

**१.२. संशोधनाची उद्दिष्टे :**

१. मराठवाड्यातील मागासपणाची कारणे अभ्यासणे.

२. मराठवाड्यातील विकासाची संकल्पना स्पष्ट करणे.

३. मराठवाड्यातील विकासाचा अनुशेष दूर करण्यासाठीच्या उपयोजना अभ्यासाने

**१.३. गृहीतके :**

१. आजही मराठवाड्यातील अधिक क्षेत्रात विकासाचा अनुशेष मोठा प्रमाणात आहे.

२. मराठवाड्यातील अनुशेष यास कारणीभूत येथील सामाजिक मागासलेपण, शिक्षणाची गुणवत्ता कमी, निरक्षर जनता, सतत पडणारा दुष्काळ, त्याप्रमाणात जलसिंचन सुविधांची कमी या गोष्टी कारणीभूत आहे.

**१.४. मराठवाडा विकासाचा अनुशेष यास कारणीभूत घटक:**

कल्याणकारी नेतृत्व ज्याही प्रदेशाला लाभले. अशा प्रदेशाचा विकास झालेला आपणास पहावयास मिळतो. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत आज हा भाग मागास असल्याचे समजते. १९६० पर्यंत येथील नेतृत्वांनी संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्यासाठी धडपड केली. अनेक विकासाचे धोरणे या भागासाठी बनवली गेली. परंतु त्याची अंमलबजावणी म्हणावी तशी झाली नाहीयाला कारणीभूत या भागातील राजकीय नेतृत्व ठरले असेच म्हणावे लागेल. ज्यावेळी काही विकासात्मक धोरणे ठरवली गेली. ते पूर्ण होण्यासाठी त्यामागे रेटा कोणी धरला नाही. मराठवाडा या भागाचा प्राथमिक क्षेत्राचा राज्यातील उत्पन्नाचा वाटा चांगला असला तरी उद्योगाचा वाटा मात्र खूप कमी आहे. या भागाचा अनुशेष वाढण्यास कारणीभूत घटकामधे सामाजिक मागासपण हे सुद्धा आहे स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. शिक्षणाचा दर्जा खालावलेला आहे. कुपोषण, आरोग्याच्या सुविधा, मागासवर्गीयांचे प्रमाण जास्त तसेच बहुसंख्य लोक शेती करतात साक्षरतेचे प्रमाण या भागात खूप कमी आहे. साक्षरता हा घटक सर्वच क्षेत्राचा मूळ आहे.साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याने येथील जनता कोणत्याही विकास कामात सहभागी होत नाही.

शिक्षणाची गुणवत्ता या भागात खूप कमी आहे कारण पदव्या मिळेपर्यंत येथील विद्यार्थ्यांमध्ये कर्तुत्वाची धमक दिसत नाही.व्यावसायिक शिक्षणाकडे दुर्लक्ष होऊन गुणांची संख्या आज विद्यार्थ्यांचा विकास निश्चित करत आहे तंत्र शिक्षण देणाऱ्या आणि व्यावसायिक कुशलतांचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थाच मुळात येथे कमी आहे हा प्रदेश हैद्राबाद संस्थानात दीर्घकाळ होता. त्या काळात मातृभाषेतून शिक्षण न मिळाल्याने तसेच शिक्षणाच्या सोयीसुविधा उपलब्ध नसल्याने खूप कमी लोक त्या काळात उच्च शिक्षण घेऊ शकले.याचा परिणाम दीर्घकाळ या भागाच्या विकासावर झाला. मराठवाड्यातील पावसाची वार्षिक सरासरी ६७९ मी.मी आहे. सतत पडणारा दुष्काळ यामुळे येथील शेतकरी नेहमी चिंतेत असतो या भागात १३ टक्यापेक्षा कमी सिंचन, ३ टक्यापेक्षा कमी वनक्षेत्र तसेच ८० टक्के जमिनीचे सेंद्रिय कर्ब कमी झालेले असल्याने नैसर्गिक साधनसंपत्तीच्या बाबतीत हे दारिद्र्य झाकता येण्यासारखे नाही

**१.५. मराठवाडा विकास संकल्पना :**

मराठवाड्याचा विचार केल्यास या प्रदेशाच्या विकासावर अनेक बाबींचा परिणाम झालेला दिसतो. त्यामध्ये दीर्घ काळ असलेली निजामी सत्तेमुळे या प्रदेशाचे अतोनात नुकसान झाले. सरजामशाही अर्थव्यवस्था असलेल्या निजामांनी जनतेला आपल्या नियंत्रणाखाली ठेवले.कल्याणकारी राजांचा अभाव तसेच सरजामशाही प्रशासन असल्याने त्याकाळच्या महाराष्ट्रावर सत्ता असलेल्या इतर राज्यकर्त्यांच्या प्रदेशाच्या तुलनेत मराठवाड्याची हानी झाली. मराठवाड्याच्या मागासलेपणासाठी येथील भौगोलिक प्रदेश हि जबाबदार आहे. सतत पडणारा दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती यामुळे या प्रदेशाचे अधिक नुकसान झाले आहे येथील माती हि काळीभोर असतांनाही पाण्याअभावी शेतीचा अधिकचा विकास होतांनी दिसत नाही. निजामांपेक्षा मराठी राज्य बरे या हेतूने मराठवाडा संयुक्त महाराष्ट्रात सामील झाला. विदर्भाप्रमाणे आपल्या विकासासाठी कधी हा प्रदेश प्रकर्षाने भांडतांनी आढळला नाही जणू महाराष्ट्रात स्वतः जबरदस्तीने येऊन आपला आवाज विसरला असेच म्हणावे लागेल. आज सर्वच क्षेत्रात या भागाची कोंडी झालेली दिसून येते. त्यामध्ये रोजगार-नोकरी, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक या क्षेत्रात जनता निष्क्रिय झाली आहे. विकासाचा मुद्दा असो, नामांतराचा प्रश्न असो, धार्मिक प्रश्न असो, शेतकऱ्यांचे आंदोलन असो, हा वैफल्यग्रस्त मराठवाडा सर्वात पुढे असतो. या सर्वाचे कारणच मराठवाड्याचे मागासपण आहे.

महाराष्ट्रातील कोकण, विदर्भ आणि मराठवाडा या प्रादेशिक विभागाच्या विकासाचा अभ्यास केल्यानंतर समजते कि, कोकण आणि विदर्भ या विभागाच्या तुलनेने मराठवाडा आजही मागासलेला आहे.सद्यस्थितीत मराठवाड्यामध्ये एकूण आठ जिल्हे आहेत. यातील फक्त छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्याचा विकास झाला आहे. कोणत्याही एका शहराचा विकास म्हणजे संपूर्ण मराठवाड्याचा विकास झाला असे म्हणता येणार नाही. या विभागातील हिंगोली, जालना, उस्मानाबाद, या सारखे जिल्हे आजही विविध क्षेत्रात खूप मागे आहे.त्यामुळे मराठवाड्याचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे.१९५३ मध्ये या भागाच्या विकासासाठी झालेला नागपूर करार, १९५६ सालचे राज्य घटनेतील कलम ३७१(२) १९८३ सालची सत्यशोधन समिती असे विविध प्रयत्न या विभागाच्या विकासाच्या दृष्टीने होत राहिले. (कुलकर्णी,भु.१९९८). तरीही विकासाचा विभागीय असमतोल कमी झालेला दिसत नाही. इतर विभागाच्या मानाने मराठवाडा या भागाचा विकास मंद गतीने सुरु आहे केंद्राकडून मंजूर होऊन आलेले अनेक प्रकल्प आज विदर्भात स्थापन होतात यामध्ये मराठवाड्यातील अकुशल नेतृत्वांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही या भागातील विशिष्ट काळात काही नेत्यांनी या भागाचा विकास साधला म्हणजे विकासाचा अनुशेष संपला असे होत नाही तर त्या त्या काळात या विभागातील प्रभावी नेतृत्वांनी आपल्या राजकीय गुणांचा प्रभावी वापर करून या भागाच्या विकासाचा अनुशेष कमी केला पाहिजे. आज अनेक उद्योजक या भागात आपले उद्योग येथे नसलेल्या सुविधांमुळे इतरत्र उभारत आहे. जायकवाडी सारखे महाकाय धरण या विभागात आहे, तरीही सिंचनाच्या सुविधांचे नियोजन नसल्याने त्या कमी पडतांनी दिसतात.

**१.६. मराठवाड्याचा अनुशेष कमी करण्यासाठी उपयोजना :**

१. मराठवाडा या विभागामध्ये जर शैक्षणिक विकास घडवून आणावयाचा असेल तर व्यावसायिक शिक्षणावर भर दिला पाहिजे. आज व्यावसायिक शिक्षणाचा समावेश अभ्यासक्रमात आहे. परंतु ते म्हणाव्या तेवढ्या प्रकर्षाने मुलांपर्यंत जात नाही यावर काही उपयोजना करावयास हव्या.

२. १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम रोजी दरवर्षी मराठवाड्याचे केंद्रबिंदू छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाड्याच्या विकासासंबंधी बैठक पार पडते. त्या बैठकीत घेतलेले जे काही निर्णय असतील त्या सर्वांची काटेकोर अंमलबजावणी झाली पाहिजे. त्यासाठी

मराठवाड्यातील नेतृत्व तसेच येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यात सक्रीय असले पाहिजे.

३. उत्तर कोकण खोऱ्यातून गोदावरी नदीमध्ये अतिरिक्त पाणी आणणे. त्याचा वापर वेगवेगळ्या भागासाठी करणे.

४. सुरुवाती पासून या भागातील होतकरू विद्यार्थ्यांची आबाळ झाली आहे या भागात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय शिक्षणसंस्थांचा मोठा अभाव आहे. त्या स्थापन होणे गरजेचे आहे.

५. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञानासाठी प्रसिद्ध आहे. परंतु यावर आधारित मोठा उद्योग येथे स्थापन होत नाही

६. मराठवाडा या प्रदेशाला ऐतिहासिक वारसा आहे. परंतु दळणवळणाच्या कमी सुविधा असल्याने येथील पर्यटन विकास खुंटला आहे त्यामुळे दळणवळणाच्या उच्च सुविधा येथे निर्माण झाल्या पाहिजे

७. शेतकरी हितासाठी आयात-निर्यात धोरणात सातत्य असले पाहिजे. मराठवाड्याची अर्थ व्यवस्था मुळात शेतीवर अवलंबून आहे.त्यामुळे शेतीवर आधारित शाश्वत विकासाचे धोरण या भागात राबवले गेले पाहिजे.

**१.७. निष्कर्ष :**

१. मराठवाडा या प्रदेशात सुरुवातीच्या काळापासून अनेक राजकीय सत्ता आस्थित्वात होत्या. या काळात ठराविक सत्ता होत्या कि, ज्यांनी या भागात विकासाच्या योजना अंमलात आणल्या. या विभागाची सर्वात मोठी हानी दीर्घकाळ सत्ता असलेल्या निजाम काळात झाली. कल्याणकारी राजे कमी असल्याने निजाम सत्तेने या प्रदेशात शैक्षणिक सुविधांची तसेचमातृभाषेतून शिक्षणाच्या संधी उपलब्ध केल्या नाही. यामुळे या भागातील खूप कमी जनसंख्या शिक्षणाकडे वळली

२. मराठवाडा या प्रदेशाचा विकासाचा अनुशेष यास जबाबदार बाबी म्हणजे शिक्षणाच्या सोयीसुविधांचा अभाव, नेहमी पडणारा दुष्काळ, कल्याणकारी राजे नसलेली निजामांची अन्यायकारी सत्ता, हैद्राबाद राज्यातून बाहेर पडण्यासाठी लढा, स्वातंत्र्य संग्रामानंतर या विभागाच्या विकासाकडे झालेले दुर्लक्ष यामुळे या भागात कमी कालावधीत जास्त प्रमाणात प्रभावी नेतृत्व निर्माण होऊ शकले नाही.

३. विकासाच्या कोणत्याही अटी न घालता हा विभाग सुरुवातीला द्विभाषिक मुंबई राज्यात आणि १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्रात सामील झाला. याचा परिणाम विकासाच्या बाबतीत येथील जनता दीर्घकाळ भोगत आहे.ज्या प्रमाणे विदर्भ काही अटी ठेऊन महाराष्ट्रात सामील झाला. याचा लाभ विदर्भाला मोठ्याप्रमाणात झाला. ज्या काही योजना मराठवाडा या विभागासाठी मांडल्या गेल्या त्यातील बहुतेक कागदावरच राहिल्या. यामुळे या भागाची खरी जबाबदारी येथील राजकीय भूमिपुत्रांवर पडली होती

४. १९५३ मध्ये या भागाच्या विकासासाठी झालेला नागपूर करार, १९५६ सालचे राज्य घटनेतील कलम ३७१(२) १९८३ सालची सत्यशोधन समिती असे विविध प्रयत्न मराठवाड्याच्या विकासासाठी झाले. परंतु प्रत्यक्षात मात्र ते कागदावरच राहिले. साक्षरता, व्यावसायिक शिक्षणाचा अभाव, दारिद्र्य, सततचा दुष्काळ यामुळे या विभागाचा विकास खुंटलेला दिसतो

५. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांपैकी छत्रपती संभाजीनगर आणि जालन्याचा काहीसा भाग सोडला तर कोठेही उद्योगाची भरभराट झाली असे दिसत नाही.

६. मराठवाड्याच्या या मागास परिस्थितीसाठी येथील अकुशल नेतृत्व तर जबाबदार आहेच. शिवाय विदर्भाप्रमाणे विकासाचे ध्येर्य असलेली जनता मराठवाड्यात विकासाची मागणी करातांनी दिसत नाही.

**१.८. समारोप :**

मराठवाडा या विभागाचा अनुशेष मोठा आहे. अगदी प्राचीन काळापासून या भागात अनेक राजकीय स्थित्यंतरे घडून आले

शिक्षणाच्या सुविधा नसल्याने या भागातील जनता विकासाच्या योजनेत म्हणावा तसा भाग घेऊ शकली नाही. म्हणूनच हा विभाग अजूनही मागास पहावयास मिळतो.मराठवाड्याचा विकास म्हणजे आठ जिल्ह्यांचा विकास ही संकल्पना ठेऊन या विभागाचा विकास साधला पाहिजे. सदरील अभ्यासाचा संशोधकांना मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष अभ्यासातांनी नक्की होईलया उद्देशाने सदरील अभ्यासाची मांडणी करण्यात आली आहे.

**संदर्भ :**


१. रोडे सो.(२०११). मराठवाड्याचा इतिहास. पिंपळापुरे प्रकाशन छत्रपती संभाजीनगर

२. शर्मा. ज.रा.(१९६०). मराठवाडा विविध अंगाचा परिचय, विश्वभारती प्रकाशन मालेगांव

३. डॉ.पांडे, वि.(१०१९). मराठवाडा आणि महाराष्ट्र. सायन पब्लिकेशन्स पुणे

४. डॉ.कठारे, अ. डॉ.नगराळे, एन.(१९९९). मराठवाड्याचा इतिहास. कल्पना प्रकाशन नांदेड

५. डॉ.करपे,रा.(२०१६). मराठवाड्याचा इतिहास, चिन्मय प्रकाशन, छत्रपती संभाजीनगर

६. कुलकर्णी,भु.(१९९८). मराठवाड्याचा विकास अभ्यास व चिंता. पद्मा प्रकाशन, छत्रपती संभाजीनगर